क्रमांक- २१

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६/ फाल्गुन ५, शके १९४७

२१. 'विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी व बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. मा. राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास एका सदस्यास दहापेक्षा अधिक सुधारणा देता येत नाहीत अशी तरतूद म.वि.स. नियम ६१ मध्ये करण्यात आली आहे. **त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, ज्या सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना GAIS या संगणक प्रणालीवर संपूर्णत: ऑनलाईन (Online) पध्दतीने बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत द्याव्यात. त्यांनतर प्राप्त होणा-या सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत. सर्व विधानसभा सदस्यांकरिता मा.राज्यपालांच्या सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या अभिभाषणाची प्रत (मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील) या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. आभार प्रदर्शन प्रस्तावास सदस्यांकडून देण्यात येणाऱ्या सुधारणांच्या पुस्तिकेचे वितरण सन्माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या टपालखणांद्वारे वितरीत करण्यात येईल.**

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी,२०२६

जितेंद्र भोळे
सचिव -१
महाराष्ट्र विधानसभा

याची प्रत :

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
४) संगणक कक्ष (वेबसाईठ) व MKCL कक्ष